

आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) औरंगाबाद
# School Leadership Academy, Maharashtra

## संपादकीय

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) ही दि.७ मे १९९४ च्या शासन निर्णयानुसार स्थापित झालेली महाराष्ट्र शासनाची राज्यस्तर स्वायत्त संस्था आहे. संस्थेत स्थापनेपासून आजपर्यंत मुख्याध्यापकांपासून ते राज्यस्तर अधिकाऱ्यांच्या नियोजन, प्रशासन व व्यवस्थापनाच्या अनुषंगाने सक्षमीकरणाचे कार्यक्रम संस्थेमार्फत कार्यान्वित झालेले आहेत. दि.५ जानेवारी २०१७ च्या शासन पत्रानुसार मिपा संस्थेला शालेय नेतृत्व अकादमी (School Leadership Academy) म्हणून महाराष्ट्र राज्यासाठी घोषित केलेले आहे. त्या अंतर्गत राष्ट्रीय शैक्षणिक विकसन व क्षमता बांधणीसाठी वैविध्यपूर्ण व तंत्रज्ञानाभिमुख कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. मिपा औरंगाबाद मार्फत सन २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१ या कालावधीत वेगळा मार्ग यशस्वीपणे स्वीकारणाऱ्या व सकारात्मक बदल घडवून आणलेल्या उत्कृष्ट शाळांची निवड करून त्या शाळांच्या केसस्टडी निपा नवी दिल्ली च्या वेबसाईटवर अपलोड केलेल्या आहेत.

यावर्षी केसस्टडी ऐवजी केसलेट बुक तयार करण्यात यावे असे निपा,नवी दिल्ली मार्फत सूचित करण्यात आले. केसलेटचा अर्थ – शिक्षण क्षेत्रातील विविध प्रसंग, घटना शैक्षणिक संकल्पनांचा वापर तसेच शैक्षणिक कामकाजात येणाऱ्या अडचणी, शालेय शिक्षणात सतत भेडसावणाऱ्या समस्या यावर आधारित उतारे व परिच्छेद यांचा समावेश असून संबंधित उताऱ्यावर आधारित विचारप्रवर्तक व मुक्तोत्तरी प्रश्नांचा समावेश या केसलेटमध्ये केलेला आहे. शालेय नेतृत्व विकास कार्यक्रमाअंतर्गत विविध उपक्रम, PSLM सारखे ऑनलाईन अभ्यासक्रम पूर्ण करताना, स्वत:च्या शाळांमध्ये येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी आणि उत्कृष्टतेकडे जाण्यासाठी दिशादर्शक तसेच संदर्भ साहित्य म्हणून निश्चितच मुख्याध्यापक व शिक्षकांना केसलेट मार्गदर्शक ठरतील.

श्री.रमाकांत काठमोरे
**संचालक**
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन
व प्रशासन संस्था (मिपा) औरंगाबाद

मुख्य संपादक
श्री रमाकांत काठमोरे
संचालक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद

सहसंपादक
डॉ. ज्योती कुलकर्णी
समन्वयक (प्रशिक्षण)
महाराष्ट शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद

आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) औरंगाबाद

# School Leadership Academy, Maharashtra

## CASELET EXAMPLE 1

'इसिडोर – आय – राबी 'नावाचे एक प्रसिद्ध भौतिक शास्त्रज्ञ होते. पत्रकारांनी त्यांना एकदा प्रश्न विचारला, तुमच्या या कामाची प्रेरणा तुम्हाला कोठून मिळाली ? तेव्हा ते शास्त्रज्ञ म्हणाले, “माझ्या आईने माझ्यासाठी दिलेला महत्वपूर्ण वेळ” प्रत्येक आईला आपल्या मुलाचे कौतुक असते. शाळेतून आला की तो काय काय शिकला हे जाणून घेण्याची आईला उत्सुकता असते. त्यामुळे जवळपास प्रत्येक आईचा हा प्रश्न कायम असतो की, तुला आज शाळेत शिक्षकांनी काय शिकवले ? पण माझी आई हा प्रश्न कधीच विचारत नव्हती, मी शाळेतून घरी आलो की ती मला विचारायची, तू आज शिक्षकांना कोणता प्रश्न विचारलास ? मला आईचा हा दिनक्रम माहिती झाला होता त्यामुळे जाताना रस्त्याने मी सतत निरीक्षण करायचो ज्यातून मला शिक्षकांना विचारण्यासाठी प्रश्न सापडायचे आणि त्यातूनच आज एक शास्त्रज्ञ म्हणून मी तुमच्यासमोर आहे. आज मात्र कळत नकळत किंवा मुलांच्या मानसिकतेला समजून न घेतल्याने का होईना आपण एक जबाबदार पालक म्हणून मुलांकडे दुर्लक्ष करतोय का ? या प्रश्नावर मंथन करण्याची वेळ आली आहे, मुलांना वेळ न दिल्याने तीही पालकांपासून दूर जात आहेत आणि आभासी जगात रमण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. कुटुंबाचा चरितार्थ चालविण्यासाठी दोघांनाही अर्थार्जन करावे लागत आहे, यात काही गैर नाही, पण हे सर्व करत असताना ज्या पिढीसाठी आम्ही हे कमावतोय तीच आपल्यापासून दूर जात असतील तर...हे सर्व अनर्थ टाळायचे असतील तर मुलांना पैशांपेक्षाही अमूल्य अशी एक गोष्ट द्यावी लागेल ,ती म्हणजे ' क़्वालिटी टाईम'.

**वरील केसलेट मधील माहितीनुसार खालील प्रश्नाची उत्तरे द्या.**
**उत्तर लिहिताना प्रथम खालील सूचनांचा अवलंब करा.**
*** कमीतकमी शब्दात अधिक व योग्य आशय उत्तरातून प्राप्त व्हावा**
*** नेमके शब्द व वाक्य वापरून उत्तर लेखन अपेक्षित.**

१.इसिडोर यांच्या आईच्या विचारांशी आपण सहमत आहात काय ? उत्तर होय / नाही असेल तरीही सकारण स्पष्ट करा.

२.मुलांच्या जिज्ञासू वृत्तीचा फायदा शाळा व विद्यार्थी विकासासाठी कसा करून घेता येईल ? किमान एक उदाहरण द्या.

३.मुलांना पैशांपेक्षाही अमूल्य अशी एक गोष्ट द्यावी लागेल, ती म्हणजे 'क़्वालिटी टाईम' यावर आपले मत थोडक्यात मांडा.

---

## CASELET EXAMPLE 2

मिलिंद सर जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत कार्यरत आहेत, त्यांच्याकडे इयत्ता ८ वी च्या वर्गाची जबाबदारी आहे. वर्गातील काही मुले अनेकदा गैरहजर राहणे, हजर असले तरी शिकण्याकडे फारसे लक्ष न देणे अशा बाबी त्यांच्या लक्षात आल्या. जेव्हा या समस्येबाबत इतर मुलांशी त्यांनी संपर्क साधला तेव्हा ही मुले शाळेजवळ किंवा गावात इतर ठिकाणी थांबून धूम्रपान, तंबाखू अशी व्यसने करत एका ठिकाणी गट करून शाळेच्या वेळेत बसून राहतात असे सरांना कळाले. जेव्हा त्या मुलांची कौटुंबिक स्थिती आणि ज्या भागात राहतात ती सामाजिक स्थिती, अशा ठिकाणी सरांनी चौकशी केल्यानंतर असे कळाले की, कुटुंबातील सदस्य आणि शेजारी यांच्याकडूनच अशा सवयी या मुलांनी घेतल्या. ही कुटुंबे दारिद्र्य रेषेखालील असून त्यांचे रोजगार कमी आहेत. या मुलांच्या सवयीमधून शाळेतील आणखी मुले त्यांच्यासोबत अशाच वाईट बाबी शिकत आहेत. त्यामुळे ही समस्या लवकर सोडविणे खूप आवश्यक आहे, हा विचार मिलिंद सर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केला.

**वरील केसलेट मधील माहितीनुसार खालील प्रश्नाची उत्तरे द्या.**
**उत्तर लिहिताना प्रथम खालील सूचनांचा अवलंब करा.**
*** कमीतकमी शब्दात अधिक व योग्य आशय उत्तरातून प्राप्त व्हावा**
*** नेमके शब्द व वाक्य वापरून उत्तर लेखन अपेक्षित.**

१. आपल्या मते युवा पिढीत वाईट सवयी स्वीकारण्यासाठी नेमकी कोणती कारणे असावीत ?
२. विद्यार्थ्यांना नैतिकतेच्या दृष्टीने चांगल्या सवयी लागाव्यात यासाठी शाळांची भूमिका काय असावी, केवळ तीन मुद्दे लिहा ?
३. तात्कालिक स्वरुपात एक मुख्याध्यापक म्हणून या समस्येबाबत आपली भूमिका थोडक्यात लिहा ?
४. शालेय विद्यार्थ्यांमध्ये चांगले परिवर्तन येण्यासाठी आपल्या मते कोणत्या उपाय योजना शाळेने कराव्यात (किमान तीन) ?

---

## CASELET EXAMPLE 3

सुजाता मॅडम इयत्ता ९ वी १० वीच्या वर्गांना विज्ञान शिकवते. कोविडच्या पार्श्वभूमीवर ती ऑनलाईन माध्यमातून विद्यार्थ्यांना विषय शिकवते. ती मुलांची आवडती शिक्षिका आहे कारण, वर्गाचे वातावरण मैत्री पूर्ण ठेवते. कोणतीही दडपशाही, एकतर्फी शिक्षक निर्णय या बाबी ती कटाक्षाने टाळते. विद्यार्थ्यांचा या शिक्षिकेच्या ऑनलाईन वर्गासाठी चांगला प्रतिसाद असतो. एक दिवस इन्स्टाग्राम वर पोस्ट बघतांना, एक व्हिडीओ सुजाता मॅडम यांनी पाहिला ज्यात त्यांच्या वर्गातलाच एक विद्यार्थी एका मुलीसोबत विचित्र, अश्लील चाळे करतांना व्हिडीओमध्ये दिसत होता आणि आश्चर्य म्हणजे या पोस्टला अनेक लाईक, शेअर आणि कॉमेंट्स मिळाल्या होत्या. या सर्व बाबींचा सुजाताला धक्काच बसला आणि त्यांनी या मुलाला योग्य मार्गदर्शन करण्याचे ठरविले आणि यातूनच सर्व वर्गाला सायबर सेक्युरिटीबाबत मार्गदर्शन करण्याचा त्यांनी विचार केला.

**वरील केसलेट मधील माहितीनुसार खालील प्रश्नाची उत्तरे द्या.**
**उत्तर लिहिताना प्रथम खालील सूचनांचा अवलंब करा.**
*** कमीतकमी शब्दात अधिक व योग्य आशय उत्तरातून प्राप्त व्हावा**
*** नेमके शब्द व वाक्य वापरून उत्तर लेखन अपेक्षित.**

१. संबंधीत विद्यार्थ्याला त्याचा स्वाभिमान दुखावला न जाता त्याची चूक समजावी यासाठी सुजाता मॅडम यांनी काय करणे अपेक्षित आहे असे आपल्याला वाटते ?
२. मुलाच्या पालकांना बोलविणे, त्यांना त्याच्या कृत्याबाबत अवगत करणे, ही समस्या सोडविण्यासाठी पालकांची मदत घेणे या बाबी मॅडमने कराव्यात किंवा करू नये आपले मत मांडा ?
३. सुजाता मॅडमने संबंधित मुलाशी व त्या मुलीशी वैयक्तिक संवाद साधावा की साधू नये याबाबत आपले मत व्यक्त करा ?
४. वरील प्रसंगावरून ऑनलाईन शिक्षण पद्धतीमुळे मुलांचे नुकसानच जास्त होत आहे अशी ओरड ऐकायला मिळते यावर आपली टिपणी द्या ?

---

## CASELET EXAMPLE 4

एका माध्यमिक शाळेत निर्मल सर मुख्याध्यापक आहेत. त्यांच्या शाळेत ९ वी मध्ये शिकणाऱ्या तन्मय या मुलाबाबत एक तक्रार त्यांच्या शिक्षकांनी केली. ज्यात तन्मय वर्गात सतत भांडणे, मारामाऱ्या करतो, अभ्यासात लक्ष देत नाही, सांगितलेल्या सूचनांची अंमलबजावणी करत नाही. तसेच वर्गातील इतर अनेक विद्यार्थ्यांनी त्याच्या विरोधात तक्रारी केल्या आहेत. शिक्षकांनी आपल्या स्तरावर तन्मयला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही. म्हणून शिक्षकांनी ही समस्या मुख्याध्यापकांना सांगितली. त्यानंतर निर्मल सर यांनी तन्मयच्या वडिलांना शाळेत बोलावून त्यांच्याशी संवाद साधला. तन्मयचे वडील अतिशय कडक शिस्तीचे आहेत. त्याचा आठवीमध्ये दुसरा नंबर मिळाल्यामुळे त्याला वडिलांनी स्मार्ट फोन भेट दिला. परंतु सध्या तो सतत त्यावर गेम खेळत असतो. अनेकदा रात्रभर तो जागा असतो. त्यांनी रागावणे, शिक्षा देणे हे प्रकार अवलंबिले परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नाही. वडिलांकडून मिळालेली माहिती ऐकल्यानंतर निर्मल सरांनी तन्मय सोबत प्रत्यक्ष बोलण्याचे ठरविले.

**वरील केसलेट मधील माहितीनुसार खालील प्रश्नाची उत्तरे द्या.**
**उत्तर लिहिताना प्रथम खालील सूचनांचा अवलंब करा.**
*** कमीतकमी शब्दात अधिक व योग्य आशय उत्तरातून प्राप्त व्हावा**
*** नेमके शब्द व वाक्य वापरून उत्तर लेखन अपेक्षित.**

१. तन्मयच्या वडिलांनी स्मार्ट फोन भेट देण्याची कृती बरोबर होती काय ? आपली भूमिका मांडा.
२. तन्मयला योग्य वळण मिळावे यासाठी मुख्याध्यापक म्हणून आपण कोणते प्रयत्न कराल थोडक्यात मुद्दे मांडा ?
३. सायबर सेक्युरिटीबाबत माहिती प्राप्त होण्यासाठी शिक्षक व मुख्याध्यापकांना प्रशिक्षण देणे गरजेचे वाटते का ? उत्तर होय / नाही असल्यास कारणे नमूद करा ?

---

## CASELET EXAMPLE 5

श्रीमती पाटील मॅडम एका तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी आहेत. राज्यस्तरावरून शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यक्रम सुरु झाला. ज्यात प्रत्येक जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये शिक्षकांनी वर्ग स्तरावर शैक्षणिक साहित्य निर्मिती करणे बाबत्त सूचना देण्यात आल्या होत्या. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पाटील मॅडम यांनी केंद्रप्रमुख व विस्तार अधिकारी यांची बैठक घेऊन एक नियोजन आराखडा तयार केला व त्यानुसार सर्वांना जबाबदाऱ्या देऊन सर्वांना काम करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. मात्र सदर काम किती पूर्ण झाले याबाबत जिल्हास्तरावरील बैठकीत ज्यावेळी या कामाचा आढावा घेण्यात आला तेव्हा असे लक्षात आले की, सर्वात कमी शैक्षणिक साहित्य निर्मिती पाटील मॅडम यांच्या तालुक्यात झालेली आहे. याबाबतचा आढावा त्यांनी केंद्रप्रमुख व विस्तार अधिकारी यांच्या कडून घेतला असता त्यांना समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत.

**वरील केसलेट मधील माहितीनुसार खालील प्रश्नाची उत्तरे द्या.**
**उत्तर लिहिताना प्रथम खालील सूचनांचा अवलंब करा.**
*** कमीतकमी शब्दात अधिक व योग्य आशय उत्तरातून प्राप्त व्हावा**
*** नेमके शब्द व वाक्य वापरून उत्तर लेखन अपेक्षित.**

१. पाटील मॅडम यांच्या तालुक्यात सर्वात कमी शैक्षणिक साहित्य निर्मितीची कारणे आपल्या मते काय असावीत ?
२. साहित्य निर्मितीचे काम उत्तम होण्यासाठी गटशिक्षणाधिकारी म्हणून पाटील मॅडम यांनी काय करणे अपेक्षित होते ?
३. केंद्रप्रमुख व विस्तार अधिकारी यांचा या कामात सहभाग वाढविण्यासाठी गटशिक्षणाधिकारी म्हणून आपण काय केले असते ?

---

## CASELET EXAMPLE 6

प्रदीर्घ कालावधीनंतर नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० जाहीर झाले. प्रत्येक धोरणाचे यश आणि अपयश त्याच्या अंमलबजावणीवर अवलंबून असते. शिक्षण ही भारतीय समाजाच्या उत्कर्षासाठी गुरुकिल्ली आहे. त्यामुळे अंमलबजावणीच्या मुद्द्यांबाबत सखोल चर्चा व्हायला हवी. नाहीतर “तांदूळ चांगले पण भातच नीट शिजला नाही” असे व्हायचे. शालेय शिक्षणामध्ये १० + २ ही पद्धत जाऊन ५+३+३+४ ही चौपदरी योजना अमलात येणार आहे. पूर्व प्राथमिक शिक्षणाची तीन वर्षेही यात समाविष्ट केली आहेत. या धोरणात बोर्डाची परीक्षा न राहता शालेय स्तरावर विकेंद्रीकरण करण्यात आले आहे. परीक्षा पद्धतीत बदल, तंत्रज्ञानाचा वापर, व्यावसायिक अभ्यासक्रम यांचा समावेश केलेला आहे. या शिक्षण व्यवस्थेचा हेतू तार्किक विचार आणि कृती करण्यासाठी सक्षम असलेल्या आणि करुणा, सहानुभूती, धैर्य आणि चिकाटी, विज्ञानाधिष्टीत कल, कल्पनाशक्ती, नैतिक बांधिलकी आणि मूल्ये असलेल्या चांगल्या व्यक्ती विकसित करणे असा आहे असे या धोरणात नमूद केले आहे.

**वरील केसलेट मधील माहितीनुसार खालील प्रश्नाची उत्तरे द्या.**
**उत्तर लिहिताना प्रथम खालील सूचनांचा अवलंब करा.**
*** कमीतकमी शब्दात अधिक व योग्य आशय उत्तरातून प्राप्त व्हावा**
*** नेमके शब्द व वाक्य वापरून उत्तर लेखन अपेक्षित.**

१. पूर्वप्राथमिक शिक्षणाची तीन वर्षे नव्या धोरणात अनिवार्य करून चौपदरी योजना अमलात येईल, पूर्व प्राथमिक शिक्षणाला या धोरणाने दिलेले महत्व योग्य की अवास्तव आहे ? किमान तीन मुद्यांद्वारे स्पष्ट करा.

२. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील १० वी व १२ वी बोर्डाच्या परीक्षेचे विकेंद्रीकरण या बाबत आपले मत मांडा ?

३. परीक्षा घेणे, गुणवत्ता राखणे यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे / नाही, आपले मत मांडा.

---

## CASELET EXAMPLE 7

सागर सर अहमदनगर जिल्ह्यातील आदिवासी बहुल खेड्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षक आहेत. या शाळेत ठाकर, वडारी आणि ग्रामीण मराठी बोलणारी मुले येतात त्यामुळे शिक्षकांना पुस्तकाची भाषा आणि मुलांची भाषा यात खूप अडचणी येतात कारण वडारी आणि ठाकरी भाषा खूप वेगळ्या आहेत. त्यात मुलेही लाजरी-बुजरी आहेत, बोलत नाहीत, अडचणी सांगत नाहीत. या मुलांचे पालक सतत जीवन संघर्षात अडकलेले आहेत. पोटापाण्याची सोय ही एकच गरज त्यांच्यासाठी महत्वाची आहे. त्यामुळे मुले शाळेत गेली काय ? न गेली काय ? त्यांना फारसा फरक पडत नाही अशा परिस्थितीत वाड्या पाड्यातील मुले केवळ नावाला शाळेत यायची, शाळेत रमत नव्हती. लिहिणे वाचणे तर दूरच, शाळेत थांबतही नव्हती त्यामुळे मुलांचे शिक्षण आणि प्रगती हा प्रश्न सागर सर यांच्यासाठी गंभीर बनला.

**वरील केसलेट मधील माहितीनुसार खालील प्रश्नाची उत्तरे द्या.**
**उत्तर लिहिताना प्रथम खालील सूचनांचा अवलंब करा.**
*** कमीतकमी शब्दात अधिक व योग्य आशय उत्तरातून प्राप्त व्हावा**
*** नेमके शब्द व वाक्य वापरून उत्तर लेखन अपेक्षित.**

१. सागर सरांना आलेल्या समस्यांची यादी करा ?
२. शिक्षण प्रक्रियेत स्थानिक भाषा खरोखर अडसर आहे काय ? आपले स्पष्ट मत मांडा.
३. तुम्ही या समस्येवर शिक्षक म्हणून काय उपाययोजना कराल ?
४. आणखी कुणाची मदत घेऊन ही समस्या सोडवता येईल असे आपल्याला वाटते ?

---

## CASELET EXAMPLE 8

मातृभाषा ही आपली पहिली भाषा असते, मातृभाषा म्हणजे आपले आपल्या भावनांशी नातं असे अनेक तत्वज्ञ सांगतात. भावनिकदृष्ट्या आपण जे विचार करतो, तीच आपली पहिली भाषा असते. बाळ जन्माला आल्यावर घरात बोलली जाणारी भाषा ते बाळ सहजपणे शिकते. वयाची पहिली दोन वर्ष भाषा शिक्षणासाठी चांगली असतात. या काळात घरच्या, शेजारच्या व्यक्तीकडून ज्या भाषा सहजरीत्या मुलांच्या कानावर पडतात त्या त्यांना बोलता येऊ शकतात. जन्मापासून जी मुले एकापेक्षा जास्त भाषांच्या संगतीत असतात त्यांना कमी / अधिक प्रमाणात त्या भाषा समजतात, व्यक्त होण्याची संधी मिळाली तर मुले या भाषा बोलूही शकतात. मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची नैसर्गिक पद्धत आहे आणि मातृभाषा ही खऱ्या अर्थाने ज्ञानभाषा आहे जी मुलांना आईच्या पोटात असल्यापासून ऐकायला मिळते. म्हणूनच मातृभाषेतून सहज शिक्षण मिळते असे म्हणतात.

**वरील केसलेट मधील माहितीनुसार खालील प्रश्नाची उत्तरे द्या.**
**उत्तर लिहिताना प्रथम खालील सूचनांचा अवलंब करा.**
*** कमीतकमी शब्दात अधिक व योग्य आशय उत्तरातून प्राप्त व्हावा**
*** नेमके शब्द व वाक्य वापरून उत्तर लेखन अपेक्षित.**

१. वरील उताऱ्यावरून मातृभाषेतून शिक्षण हवे / नको यावर आपला स्पष्ट अभिप्राय द्यावा ?
२. भाषा विकासासाठी कोणकोणते घटक महत्वाचे आहेत असे आपल्याला वाटते ?
३. मातृभाषा म्हणजे आपलं भावनांशी नातं, म्हणूनच ते जपायला हवं. या वाक्याबाबत आपले मत द्या ?

---

## CASELET EXAMPLE 9

मानवाने आपल्या बुद्धीच्या जोरावर स्वतः चा प्रचंड विकास साधून घेतला आहे. हा विकास करून घेताना मात्र परतफेड करण्याचे तो साफ विसरला आहे. ज्याच्याकडून आपण मदत घेतो त्याच्याप्रती कृतज्ञ असतो हे आपण शिकलो आहोत. परंतु या गोष्टी मात्र माणसाने आचरणात आणल्या नाही, त्यामुळे नैसर्गिक संकट आणि आपत्तींचा सामना आपल्याला करावा लागत आहे आणि अनेकदा धोक्याच्या घंटा वाजत आहेत. वनस्पतींपासून प्राण्यांपर्यंत सगळ्यांच्याच जीवनावर या पर्यावरणाचा प्रभाव आढळून येतो. पर्यावरणाशी जो योग्य प्रकारे समन्वय साधतो तोच आनंदाने जीवन व्यतीत करू शकतो. मानवी जीवनसुद्धा यास अपवाद नाही. निसर्गाने अनेक सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत मात्र मानवाच्या स्वार्थी, अज्ञानी, बेदरकार, बेफिकीर, अविवेकी हव्यासाने पर्यावरणाचा बेसुमार वापर केल्याने अनेक जटील समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे पर्यावरण हानी होऊ न देणे, अर्थात पर्यावरणाचा ऱ्हास वाचविणे हेच आपले प्रमुख कर्तव्य आहे म्हणूनच दि.५ जून हा दिवस 'पर्यावरण दिन' म्हणून जगात साजरा केला जातो.

प्रत्येक नागरिकाने अधिक जागरूक होऊन जीवन जगल्यास भविष्यात पर्यावरणाचा समतोल साधता येऊ शकतो. अर्थात हे काम एकट्याने करण्यापेक्षा सांघिक कामगिरी निश्चितच उपयुक्त ठरेल यात शंकाच नाही. पण तरीही प्रत्येकाचा या कामात सहभाग असला तर पर्यावरण वाचविण्याच्या दिशेने योग्य पाउल असेल असे वाटते. तसेच बालपणापासून म्हणजेच शालेय स्तरावर विद्यार्थ्यांना या समस्येबाबत सतत अवगत करून, पर्यावरणाची हानी रोखण्यासाठी विचारप्रवाह बदलवून प्रत्यक्ष कृती करण्याची प्रेरणा शाळास्तरावर मिळावी असे मत अनेक पर्यावरण प्रेमी व्यक्त करतात.

**वरील केसलेट मधील माहितीनुसार खालील प्रश्नाची उत्तरे द्या.**
**उत्तर लिहिताना प्रथम खालील सूचनांचा अवलंब करा.**
*** कमीतकमी शब्दात अधिक व योग्य आशय उत्तरातून प्राप्त व्हावा**
*** नेमके शब्द व वाक्य वापरून उत्तर लेखन अपेक्षित.**

१.पर्यावरणाची हानी होण्यामागे माणसाच्या कोणत्या किमान दोन कृती सर्वात जास्त कारणीभूत आहेत असे आपल्याला वाटते ?

२.शालेय विद्यार्थ्यांना पर्यावरण शिक्षण देणे गरजेचे आहे अथवा नाही, आपला स्पष्ट अभिप्राय लिहा ?

३.पर्यावरण शिक्षण शालेय विद्यार्थ्यांना देण्यासाठी स्वतंत्र तासिका असाव्यात की नसाव्यात, उत्तर होय असेल तर वेळापत्रकात या तासिकांची सोय कशी करावी ? उत्तर नाही असल्यास सकारण स्पष्ट करा.

---

## CASELET EXAMPLE 10

आपण सगळयांनी शारीरिक मानसिक आरोग्यास घातक ठरलेल्या अशा कोरोना काळाचा अनुभव घेतला आहे. अशा परिस्थितीत पालक आणि पाल्य यांच्यासमोर एक वेगळे आव्हान पेलण्याची जबाबदारी आली आहे. काही महिन्यांपूर्वी एक नोकरदार आय.टी. इंजिनीअर आई Counselling साठी आपल्या सात वर्षाच्या मुलीला घेऊन बाल मानसतज्ञांकडे गेली. आपल्या लेकीबाबत तक्रारींची लांबलचक यादी तिने त्यांच्यासमोर वाचून दाखवली. या तक्रारी सांगण्यात अडचणी येऊ नये म्हणून तिने आपला मोबाईल मुलीच्या हवाली केला आणि आई बोलू लागली, "कालच हिला drawing मध्ये good शेरा मिळाला म्हणून Online Remote Control Dolls ऑर्डर केल्या, आणखी किती करायचे या मुलांसाठी ! तुम्हीच सांगा, तरी उलट उत्तरे देते आणि सतत काहीतरी मागत राहते, मोबाईल तर हवाच." तज्ञ मॅडम शांतपणे सर्व ऐकत होत्या आणि ती लहान मुलगी, तिला कशाशीच काही देणे घेणे नव्हते. कोण जाणे काय शोधत होती तिची इवली इवली बोटे त्या मोबाईलमध्ये....मनाच्या कुठल्या गरजेची खळगी भरत होते ते भुकेले, तहानलेले निरागस डोळे.....

**वरील केसलेट मधील माहितीनुसार खालील प्रश्नाची उत्तरे द्या.**
**उत्तर लिहिताना प्रथम खालील सूचनांचा अवलंब करा.**
*** कमीतकमी शब्दात अधिक व योग्य आशय उत्तरातून प्राप्त व्हावा**
*** नेमके शब्द व वाक्य वापरून उत्तर लेखन अपेक्षित.**

१.वरील प्रसंगात आईच्या व्यथांचे थोडक्यात वर्णन करा ?
२.लहान मुलगी सतत मागण्या का करत असावी ?
३.मुलीच्या हातात मोबाईल देऊन बाल मानसतज्ञांसोबत बोलणे आपल्या दृष्टीने योग्य की अयोग्य ? सकारण स्पष्ट करा.
४.मनाच्या कुठल्या गरजेची खळगी भरत होते ते भुकेले, तहानलेले निरागस डोळे....या वाक्याचा तुम्ही कसा अर्थ लावला थोडक्यात लिहा ?

---

## CASELET EXAMPLE 11

नीलिमा एक गृहिणी, तिचा मुलगा आता इंजिनीअरिंगचा अभ्यास करीत आहे. नीलिमाला वाचनाचा संस्कार तिच्या वडिलांकडून मिळाला. साहजिकच वाचनातील आनंद मुलालाही मिळावा, त्याला वाचनाची सवय लागावी म्हणून सुरुवातीला रिकाम्या वेळेत नीलिमा पुस्तक त्याच्या पुढ्यात टाकू लागली. तिने मुलाला पुस्तके आणून दिली. स्वतः नीलिमाने "Invisible Man" हे H.G.WELLS यांच्या पुस्तकाचा मराठी अनुवाद इयत्ता तिसरीत असताना वाचला होता, हेच पुस्तक नीलिमाने मुलाला वाचायला दिले, पण काही केल्या तो वाचेना. नीलिमा म्हणाली, "मी खूप घाबरले, अवांतर वाचन नाही म्हणजे काय ? आपला मुलगा वाचनातील आनंदाला पारखा होईल या भीतीने मीच स्वतः वाचून दाखवायला सुरुवात केली, भलेही वाचू नकोस, पण पाच मिनिटे पुस्तक समोर धर, तो अगदी अळमटळम करायचा. मी एक गोष्ट आवर्जून करायची, त्याला वाचून दाखवताना त्याच्या आवडीचा भाग आला की वाचन थांबवायचे. एक दिवस असेच मी केले आणि त्याने अक्षरशः पुस्तक माझ्या हातातून ओढून घेतले आणि वाचायला लागला. तेव्हापासून आतापर्यंत तो वाचतच आहे, त्यावेळी त्याला वाचनाची सवय लावताना केलेल्या प्रयोगाचे चांगले परिणाम आज दिसत आहेत."

**वरील केसलेट मधील माहितीनुसार खालील प्रश्नाची उत्तरे द्या.**
**उत्तर लिहिताना प्रथम खालील सूचनांचा अवलंब करा.**
*** कमीतकमी शब्दात अधिक व योग्य आशय उत्तरातून प्राप्त व्हावा**
*** नेमके शब्द व वाक्य वापरून उत्तर लेखन अपेक्षित.**

१.नीलिमाने मुलाची वाचनाची सवय वाढावी यासाठी केलेले प्रयत्न यावर तुमचे मत थोडक्यात लिहा ?
२.एक पालक म्हणून तुम्ही कोणते वेगळे प्रयत्न मुलांच्या वाचनवृद्धीसाठी केले असते ?
३.मुलांच्या वाचन सवयी वाढवणे खरोखरच गरजेचे आहे का, आपले मत द्या ?
४.आजची मुले वाचनापासून दूर जात आहेत अशी ओरड होते, याची कोणती कारणे असू शकतात ?

---

## CASELET EXAMPLE 12

‘ स्वयंपाकघर आणि कुटुंब ’ याच क्षेत्रात फिरणाऱ्या स्त्रीने शिक्षणाच्या जोरावर सर्वच क्षेत्रात एवढी मोठी झेप घेतली की तिच्या कर्तृत्वाने सगळे थक्क झाले. स्त्रीमधील सामर्थ्य सर्वांच्या लक्षात आले. ज्या शिक्षणाच्या बळावर स्त्री स्वतःचा विकास साध्य करू शकली त्या शिक्षणाची दारे तिच्यासाठी खुली केली आद्य समाज शिक्षिका सावित्रीबाई फुले यांनी ....

हे वर्तमान पाहताना हृदय अभिमानाने भरून येते, पण यासाठी पहिले पाऊल ज्या महिलेने उचलले त्या सावित्रीबाईना हे सगळे इतके सहजपणे जमले असेल का ? तो काळ, रूढी, परंपरांचा पगडा, समाजाची धारणा आणि मुख्य म्हणजे इतिहासातील स्त्री अन्यायाच्या घटना.

तरीही सावित्रीबाईनी आपला संघर्ष, लढा आणि धडपड सुरु ठेवली म्हणूनच ‘आजचा सोनियाचा दिनू’ प्रत्येक महिला पहात आहे. आज प्रत्येक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या स्त्रीच्या कर्तबगारीचे श्रेय तिच्या शिक्षणाला आहे.

आज शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक महिला व पुरुष यांची जबाबदारी निश्चितपणे वाढली असून प्रत्येक मुलीने स्वावलंबी सुजाण नागरिक म्हणून या शिक्षणातून तयार व्हावे ह्या किमान अपेक्षा प्रत्येक शिक्षकाकडून आहेत. हाच सावित्रीबाईंना आपण सर्वांनी दिलेला मानाचा मुजरा ठरेल....

**वरील केसलेट मधील माहितीनुसार खालील प्रश्नाची उत्तरे द्या.**
**उत्तर लिहिताना प्रथम खालील सूचनांचा अवलंब करा.**
*** कमीतकमी शब्दात अधिक व योग्य आशय उत्तरातून प्राप्त व्हावा**
*** नेमके शब्द व वाक्य वापरून उत्तर लेखन अपेक्षित.**

१.अजूनही अनेक ठिकाणी मुलींना शिक्षणासाठी कोणत्या सहकार्याची गरज आहे असे आपणास वाटते ?
२.शासनाच्या अनेक योजना मुलींच्या शिक्षणासाठी असताना, मुलींच्या शिक्षणातील अडथळे संपत नाहीत असे अनेक अहवाल सांगतात, आपल्या दृष्टीने नेमके कोणते अडथळे असावेत ?
३.सावित्रीबाईंना शिक्षण मिळालेच नसते तर......आपले मत मांडा.

----------------------------------------------------------------------------------------------------------------

## CASELET EXAMPLE 13

जनता विद्यालयात शिक्षिका असलेल्या माधवी मॅडम आपला अनुभव सांगत होत्या, अगदी काल परवाच माझ्या वर्गातील संजय मला म्हणाला, “कोपऱ्यात मुंग्या निघाल्या त्या चिरडून टाकू का बाई ? मला झाडूने मुंग्यांना मारायला मजा वाटते.” त्याच्या या बोलण्याने आजच्या पिढीतली मुलं असंवेदनशील झाली आहेत का ? असं वाटलं. टीव्हीवर एक कार्यक्रम सुरू होता, एका मुलाने खूप उत्कृष्ट नाच केल्यानंतर परीक्षकांनी त्याला विचारलं, तू इतका छान नाच करायला कसा शिकलास ? यावर त्याचे उत्तर हेलावून टाकणारे होते, “माझी डान्सची चांगली प्रॅक्टिस झाल्याशिवाय माझी आई मला जेवायला देत नाही, “किती भयावह वागणूक आहे ही !” अनेक पालकही संवेदनशीलता, भूतदया या मूल्यांच्या पलीकडे गेल्याचे दिसते. दोन उदाहरणे पाहिली तर असं लक्षात येतं, आजच्या यांत्रिक युगात माणूस अतिशय भावनाशून्य, संवेदनाहीन होत चाललेला आहे म्हणूनच या परिस्थितीवर मात करण्यासाठी प्राथमिक शिक्षणात मूल्यशिक्षणाची नितांत गरज आहे. भारतात खऱ्या अर्थाने लोकशाहीचे स्वप्न साकार करायचे असेल तर संस्कारशील सुजाण नागरिक घडवणे गरजेचे आहे आणि त्यासाठी मूल्य शिक्षणाला पर्याय नाही असं मला वाटते, हे मूल्यशिक्षण देण्यासाठी शाळा, शिक्षक, पालक आणि समाज या सर्वांचे योगदान मिळाले तर उद्याचा भारत हा सर्वश्रेष्ठ असेल असे माझे मत आहे असे माधवी मॅडम म्हणतात.

**वरील केसलेट मधील माहितीनुसार खालील प्रश्नाची उत्तरे द्या.**
**उत्तर लिहिताना प्रथम खालील सूचनांचा अवलंब करा.**
*** कमीतकमी शब्दात अधिक व योग्य आशय उत्तरातून प्राप्त व्हावा**
*** नेमके शब्द व वाक्य वापरून उत्तर लेखन अपेक्षित.**

१.माधवी मॅडम यांना जसे अनुभव आले तसे आपल्याला अनुभव आले असल्यास एक अनुभव थोडक्यात लिहा?

२. मूल्य शिक्षण मुलांसाठी गरजेचे आहे किंवा नाही आपले स्पष्ट अभिप्राय द्या.

३. मूल्य शिक्षणात शाळा, शिक्षक यांच्यासोबत पालक आणि समाज यांचेही योगदान आवश्यक आहे या मताबाबत आपली भूमिका लिहा.

---

## CASELET EXAMPLE 14

सीमा मॅडम यांच्या वर्गात जुलै महिन्यात वयानुरूप प्रवेश अंतर्गत मीना नावाची मुलगी इयत्ता पाचवी मध्ये दाखल झाली. तिला फिट्स येण्याच्या कारणांमुळे तिला यापूर्वी शाळेत दाखल केलेले नव्हते. तिच्या वडिलांचे पूर्वीच निधन झालेले असल्याने तिची आई मोलमजुरी करून कुटुंबाचा चरितार्थ चालवते. शाळेत कधीही न गेलेल्या मीनाला कुठून शिकवायला सुरुवात करावी याची चिंता सीमा मॅडम यांना वाटू लागली. सीमा मॅडम यांनी तिला सुरुवातीला बोलतं करण्याचा प्रयत्न केला, "तुला शाळेत यायला आवडेल का ? अभ्यास करायला आवडेल का ? " या प्रश्नांची तिने हो अशी उत्तरे दिल्यामुळे मॅडमला हायसं वाटलं. त्यानंतर मॅडमने मोर्चा आपल्या विद्यार्थ्यांकडे वळवला आणि मिनासोबत मैत्री करायची, तिला वाचता लिहिता येण्यासाठी सर्वांनी मदत करायची हे सांगितले तसेच तिच्या आजाराबद्दल कल्पना देऊन तिला शाळेत रोज येता यावे यासाठीची मदत सर्वांनी करण्याबाबत मुलामुलींना समजावून सांगितले.

या सर्व प्रयत्नातून एक आश्चर्य घडले..... मीना चार महिन्यानंतर नोव्हेंबर मध्ये वाचू लागली, बेरीज व वजाबाकी (एक अंकी) सुद्धा तिला करता येऊ लागली.

हे यश मीनाचे, तिच्या आईचे, तिच्या मित्र मैत्रिणी यांचे असून वयानुरूप शिक्षण या RTE 2009 मधील संकल्पनेचे सुद्धा आहे.

**वरील केसलेट मधील माहितीनुसार खालील प्रश्नाची उत्तरे द्या.**
**उत्तर लिहिताना प्रथम खालील सूचनांचा अवलंब करा.**
*** कमीतकमी शब्दात अधिक व योग्य आशय उत्तरातून प्राप्त व्हावा**
*** नेमके शब्द व वाक्य वापरून उत्तर लेखन अपेक्षित.**

१.सीमा मॅडम यांना मीनाच्या प्रवेशानंतर कोणत्या अडचणी आल्या असाव्यात ?
२.मीना शाळेत शिकावी यासाठीचे त्यांचे प्रयत्न थोडक्यात लिहा ?
३.वयानुरूप शिक्षण या RTE 2009 मधील संकल्पनेमुळे खरोखर मुलांचे शिक्षण घेण्याचे प्रमाण वाढू शकते किंवा नाही याबाबत आपला अनुभव /मत द्या.

---

## CASELET EXAMPLE 15

शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा शोध घेत कदम सरांनी ऊसाच्या फडात निवृत्ती आणि आशाबाई यांची भेट घेतली. कदम सरांनी दोघांनाही आधी शिक्षणाचे महत्व पटवून दिले. शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. मध्यान्ह भोजन, शालेय गणवेश, पाठ्यपुस्तके, उपस्थितीभत्ता, लेखन साहित्य, विविध स्पर्धा अशा शासकीय योजनांची माहिती सांगितली. सरांचं ऐकून घेतल्यानंतर निवृत्ती म्हणाला, “गुरुजी झालं का तुमचं बोलून, आता जाऊ द्या आम्हाला ऊस तोडणीला, आमची पोरं काही येणार नाहीत शाळेला” बराच वेळ झाला तरी सर उठत नाहीत हे पाहून निवृत्ती वरकरणी म्हणाला, “बरं तुम्ही म्हणताय तर उद्या पाठवतो शाळेत”, संपूर्ण आठवडा गेला तरी निवृत्तीची मुले काही शाळेत आली नाही. शेवटी सर परत त्यांच्या खोपीवर गेले तर दोघेही नवरा बायको ऊस तोडणीसाठी जाण्याच्या तयारीत होते, सरांना पाहून दोघांच्याही कपाळावर आठ्या उभ्या राहिल्या, निवृत्ती म्हणाला, “ गुरुजी, नाही जमायचं पोरं शाळेत पाठवायला, मी ऊस तोडतो, ही मोळ्या बांधती तर थोरली पोरगी लहान पोरांना सांभाळती आणि ऊसाच वाढ पण गोळा करती आणि लहान पोरांनाही सांभाळती म्हणून आम्ही जास्त ऊस तोडतो, मग आम्हाला जास्ती पैसे मिळतात आणि शाळा शिकून तरी काय करायचं ? मोठं झाल्यावर पण उसच तोडायचा आणि आता पण तेच करायचय, गुरुजी तुम्ही जा आता. आम्हाला जमायचं नाय, आम्हाला ऊस तोडायला उशीर होऊ लागलाय, तुम्ही जा गुरुजी शाळेत ” निवृत्तीचे बोलणे ऐकून शेवटी गुरुजी शाळेत परत फिरले.

**वरील केसलेट मधील माहितीनुसार खालील प्रश्नाची उत्तरे द्या.**
**उत्तर लिहिताना प्रथम खालील सूचनांचा अवलंब करा.**
*** कमीतकमी शब्दात अधिक व योग्य आशय उत्तरातून प्राप्त व्हावा**
*** नेमके शब्द व वाक्य वापरून उत्तर लेखन अपेक्षित.**

१.कदम सरांनी मुले शाळेत यावी यासाठी कोणते प्रयत्न केले ?
२.निवृत्ती मुलांना शाळेत पाठवायला तयार नव्हता, त्याने दिलेल्या कारणांबाबत आपले मत थोडक्यात मांडा?
३.कदम सरांच्या जागी आपण असता तर मुलांना शाळेत आणण्यासाठी कोणते विशेष प्रयत्न केले असते ?
४.शाळाबाह्य मुले ही शिक्षण प्रक्रियेत येणारी मोठी समस्या आहे, यावर कशी मात करता येईल, मुद्देनिहाय मांडा ?

---

## CASELET EXAMPLE 16

नुकतेच शाळेत तंबाखूमुक्तीचे अभियान राबविण्यात आले ज्यात अनेक उपक्रमांचा समावेश करण्यात आला. मीना वारधे ही तिशीतली एक आदिवासी महिला, तिचा मुलगा संजय हा इयत्ता चौथीतला होतकरू मुलगा मीनाला आपली मुलं खूप शिकून मोठी व्हावीत असे वाटत असे. शाळेतील बहुसंख्य पालक तंबाखू, दारू, अशा व्यसनांची सवय असलेले, शाळेच्या परिपाठात शिक्षकांनी मुलांना व्यसनांचे दुष्परिणाम समजावून सांगितले आणि त्यापासून पालकांनी दूर राहण्यासाठी मुलांनी हट्ट करावा असेही सांगितले. संजूने शाळेतील या गोष्टी आईला सांगितल्या, पण आईने दुर्लक्ष केले, मग संजूने तंबाखूची पुडी चक्क पेटत्या चुलीत टाकली, आणि "तू जोपर्यंत तंबाखू सोडणार नाही तोपर्यंत मी तुझ्याशी बोलणार नाही आणि शाळेतही जाणार नाही" असे आईला बजावले. आता मात्र मीनाने मुलाचे म्हणणे मनावर घेतले. मुलाची प्रेरणा आणि स्वतःचा निर्धार यामुळे मीनाच्या जीवनातून तंबाखू कायमची हद्दपार झाली आणि शाळेला जेव्हा हे कळले तेव्हा या दोघांचा छोटा सत्कार शाळेने केला.

**वरील केसलेट मधील माहितीनुसार खालील प्रश्नाची उत्तरे द्या.**
**उत्तर लिहिताना प्रथम खालील सूचनांचा अवलंब करा.**
*** कमीतकमी शब्दात अधिक व योग्य आशय उत्तरातून प्राप्त व्हावा**
*** नेमके शब्द व वाक्य वापरून उत्तर लेखन अपेक्षित.**

१. वाईट सवयीपासून दूर जाण्यासाठी प्रेरणा व स्वतःचा निर्धार आवश्यक आहे यावर आपले मत मांडा ?
२. शाळांमध्ये राबवण्यात येणाऱ्या अभियानाची यशस्विता कोणकोणत्या घटकांवर अवलंबून असते असे आपणास वाटते ?
३. आपल्या शाळेत असा एखादा यशदायी अनुभव प्राप्त झाला असल्यास कृपया थोडक्यात लिहा ?

---

## CASELET EXAMPLE 17

संगणकाचा महिमा

आजोबा (जयंतराव ) आणि नात (शिवानी) यांच्यात झालेले संभाषण वाचा

आजोबा : बरेच दिवस झाले बेंगलोरला येऊन! आता मला मुंबईला गेलं पाहिजे.

शिवानी : आजोबा ‘ तुम्ही खूप दिवस राहणार आहे ’, असं म्हणाला होतात.

आजोबा : अग दिवसभर मी एकटा असतो घरात. इथे मराठी वर्तमानपत्रसुद्धा मिळत नाही.
मी वेळ कसा घालवणांर ?

शिवानी : एवढंच ना आजोबा! तुम्हांला रोज मराठी वर्तमानपत्र वाचायला मिळेल, मी व्यवस्था करते.

आजोबा : ते कसं काय शक्य आहे बुवा ?

शिवानी : आजोबा, हे संगणकाचे युग आहे. नेटवरून काही सेकंदातच जगातील
कोणतीही गोष्ट आपण घरबसल्या उपलब्ध करून घेऊ शकतो. आता जगात अशक्य असं काहीच राहिलं नाही.

आजोबा : पोरी, हे सगळं मी ऐकलंय खरं....

शिवानी : आजोबा, मी नेट सुरू केलंय. कोणतं वर्तमानपत्र वाचायचंय तुम्हांला?

आजोबा : ‘सर्वकाळ’.

शिवानी : थांबा हं, मी आता ही अक्षरे संगणकावर टाईप करते.

आजोबा : अरे व्वा! सगळी पाने दिसायला लागली की इथे... सगळया बातम्या वाचतो आता!

शिवानी : आजोबा, तुम्ही आता तुमच्या मित्रांना ई-मेल पण करू शकता.

आजोबा : खरंच पोरी, संगणकाचा महिमा अगाध आहे. या संगणकाने संपूर्ण जगालाच एकदम जवळ आणलंय!

**वरील केसलेट मधील माहितीनुसार खालील प्रश्नाची उत्तरे द्या.**
**उत्तर लिहिताना प्रथम खालील सूचनांचा अवलंब करा.**
*** कमीतकमी शब्दात अधिक व योग्य आशय उत्तरातून प्राप्त व्हावा**
*** नेमके शब्द व वाक्य वापरून उत्तर लेखन अपेक्षित.**

१.वरील संभाषणातून, आजोबांना बेंगलोरमध्ये राहण्याचा का त्रास वाटत असावा ?
२. आजच्या काळात वृद्धांना सुद्धा संगणक वापरता येणे आवश्यक आहे, यावर आपले मत मांडा ?
३.वरील परिच्छेदानुसार नात लहान असूनही संगणक उत्तमरीत्या हाताळते, म्हणजे ती संगणक नेहमी वापरते, यावरून लहान मुलांना संगणक हाताळू देणे योग्य की अयोग्य, थोडक्यात लिहा ?

---

## CASELET EXAMPLE 18

एक शिक्षक उत्तम काम करतो. प्रत्येक शिक्षकाच्या मनात शिकवण्याची तळमळ असतेच, मात्र कधीकधी काय करावे, कसे शिकवावे, विद्यार्थ्यांच्या मनाच्या युगाचा वेग कसा पकडावा असे प्रश्नही शिक्षकांना पडत असतात. काही अतिप्रगत शिक्षक यातून मार्ग काढत असतात. त्यांना या प्रश्नांची उत्तरे आपले दैनंदिन अध्ययन अध्यापन करताना मिळालेली असतात. त्यांच्या वर्गातील मुलांचे अध्ययन सोपे होत असते. अशा प्रयोगशील, अतीप्रगत, नव्याने काहीतरी शोधणाऱ्या शिक्षकांचे काम इतर शिक्षकांना पाहता यावे यासाठी शिक्षणाची वारी ही संकल्पना पुढे आली. शिकविण्यामध्ये नावीन्यपूर्ण पद्धतीची भर व सतत शिकत राहणे यातूनच शिक्षक अनुभवसंपन्न होत असतो. शिक्षकांना प्रशिक्षित करून अध्ययन अध्यापनाची गुणवत्ता वाढविणे ही शासनाची जबाबदारी आहे. या जबाबदारीची जाणीव ठेवून शासनाने प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली मात्र प्रशिक्षण म्हणजे केवळ चार भिंतींच्या आतील गोष्ट नाही. स्वतःमधील क्षमता ओळखून शिक्षकांना स्वयंप्रेरित करण्यासाठी प्रशिक्षण आवश्यक आहे. तसेच उत्तम काम करणाऱ्या शिक्षकांच्या शाळांना भेटी देण्याने अनेक शिक्षकांना प्रेरणा मिळू शकतात. मात्र महाराष्ट्रातील उत्तम शाळांपर्यंत प्रत्येक शिक्षक पोहोचू शकत नाही असेही लक्षात आले . म्हणून महाराष्ट्रातील उत्तम शाळांमधील प्रयोगशील शिक्षकांना एकाच छताखाली आणले, त्यांचे प्रयोग एकाच ठिकाणी पाहण्याची संधी महाराष्ट्रातील शिक्षकांना उपलब्ध करून दिली आणि वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये व विभागांमध्ये शिक्षण वारीचे आयोजन करण्यात आले. शिक्षणाच्या वारीला मुख्याध्यापक, शिक्षकांच्या बरोबरीने पालक, विद्यार्थी, शालेय व्यवस्थापन समिती, गावकरी, लोकनेते यांनी आवर्जून येऊन भेट दिली. शेवटी शिक्षण या घटकाशी समाजातील प्रत्येक घटकाचा प्रत्यक्ष संबंध असतो. शिक्षणाच्या वारीमुळे हे सर्व घटक एकत्र येतात, शिक्षणातील उत्तम प्रयोग व यशोगाथा समजून घेतात शाळेला काय हवे आहे याचे मार्गदर्शन त्यातून त्यांना मिळते म्हणूनच शिक्षणवारीचा फायदा शिक्षण प्रक्रियेतील घटकांना झाला असे वाटते.

**वरील केसलेट मधील माहितीनुसार खालील प्रश्नाची उत्तरे द्या.**
**उत्तर लिहिताना प्रथम खालील सूचनांचा अवलंब करा.**
*** कमीतकमी शब्दात अधिक व योग्य आशय उत्तरातून प्राप्त व्हावा**
*** नेमके शब्द व वाक्य वापरून उत्तर लेखन अपेक्षित.**

१. शिक्षण वारी या संकल्पनेबाबत आपले विचार सांगा ?
२. आपण भेट दिलेल्या एखाद्या शिक्षण वारीमध्ये आपल्याला आवडलेल्या व खटकलेल्या बाबी थोडक्यात नमूद करा ?
३. शिक्षण वारी हा उपक्रम सुरु रहावा याबाबत आपले मत स्पष्ट करा ?
४. शिक्षण वारी शिक्षण प्रक्रियेत अधिक फलदायी होण्यासाठी नव्याने काय करता येईल असे आपणास वाटते ?

---

## CASELET EXAMPLE 19

शिक्षण प्रक्रियेत मूल्यमापन अनिवार्य आहे. आपण काय शिकलो, आपल्याला किती समजले हे पडताळून पाहण्यासाठी परीक्षा आहेत. दहावी, बारावीच्या परीक्षांना शाळा, पालक यांच्या दृष्टीने देखील खूपच महत्त्वाचे स्थान आहे. विद्यार्थ्यांना परीक्षेच्या ताणातून सुखरूप बाहेर पडायचं असेल तर अभ्यास हे एकच उत्तर आहे. म्हणूनच विद्यार्थीच नव्हे तर पालकांच्या दृष्टीनेही अतिशय संवेदनशील विषय म्हणजे दहावी, बारावी बोर्डाच्या परीक्षा. गेल्या काही वर्षांपासून सीईटी, नीट, जेईई यांचे असलेले महत्त्व विचारात घेतलं तर असे म्हणता येईल की या परीक्षांच्या चाळणीतून यशस्वीरित्या पार पडल्याशिवाय विद्यार्थी आपले शैक्षणिक भवितव्य निश्चित करू शकत नाहीत असे मानले जाते. गुण मिळविण्यासाठी अटीतटीचे प्रयत्न करावे लागतात, परीक्षेच्या दिशेने अभ्यासही सुरू आहे, भीती नावाचा बागुलबुवा सुद्धा काही मुलांच्या मानेवर बसला आहे, मला परीक्षा कशी जाईल? माझा अभ्यास होईल का? मला किती गुण मिळतील? मला कोणती श्रेणी मिळेल? किती टक्के मिळतील? माझा पेपर वेळेत पूर्ण होईल का? सर्वात महत्त्वाचे म्हणजे परीक्षेत सगळे आठवेल का? असे अनेक प्रश्न परीक्षेच्या भीतीपोटी अनेक विद्यार्थ्यांच्या मनात येतात. अशा वेळी विद्यार्थ्यांनी शांत राहणे, आपल्या मनातील भावना व प्रश्न मित्र, घरातील सदस्य, शिक्षक यांचेसोबत शेअर करत राहणे अशा बाबी निश्चितपणे कराव्यात ज्यातून मनावरचा ताण हलका होण्यास मदत होऊ शकते. कारण अशा ताणातून सावरता न येणारे कितीतरी विद्यार्थी परिस्थिती हाताळता न आल्याने आत्महत्या करताना नेहमीच दिसतात. मात्र आत्महत्या हे ताणापासून दूर जाण्याचे साधन नाही. म्हणूनच व्यवसाय मार्गदर्शन, समुपदेशन अशा यंत्रणा अनेक ठिकाणी उपलब्ध आहेत, ज्याचा लाभ विद्यार्थ्यांनी घेण्यासाठी ते स्वतः, त्यांचे पालक आणि शिक्षक यांची साथ सुद्धा खूप महत्वाची ठरते.

**वरील केसलेट मधील माहितीनुसार खालील प्रश्नाची उत्तरे द्या.**
**उत्तर लिहिताना प्रथम खालील सूचनांचा अवलंब करा.**
*** कमीतकमी शब्दात अधिक व योग्य आशय उत्तरातून प्राप्त व्हावा**
*** नेमके शब्द व वाक्य वापरून उत्तर लेखन अपेक्षित.**

१.परीक्षा व त्यातून विद्यार्थ्यांना निर्माण होणारे ताणतणाव यात मुख्याध्यापक व शिक्षकांची भूमिका देखील महत्वाची आहे, यावर आपला अभिप्राय लिहा ?
२.व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन ही प्रक्रिया विद्यार्थ्यांसाठी कितपत फायदेशीर आहे ?
३.परीक्षा पद्धतीत कोणत्या सुधारणा झाल्या तर विद्यार्थ्यांचे ताण कमी होतील, आपले मत व्यक्त करा.

---

## CASELET EXAMPLE 20

अरुणा मॅडम एका तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी आहेत. तालुक्यात २३ केंद्र असून शाळांची संख्या जास्त असल्याने कामाचा व्याप जास्त आहे. पंचायत समिती अंतर्गत सर्व कामे सर्व अधिनस्त कर्मचारी आणि अधिकारी यांना वाटप करून जबाबदारी देण्याचे काम नेहमी अरुणा मॅडम करतात. पंचायत समिती अंतर्गत नियमित बैठका घेण्यास त्या फारशा उत्सुक नसतात त्यामुळे बरीच कामे प्रलंबित असतात. जिल्हास्तरीय बैठकांना उपस्थित राहण्याचे त्या टाळतात. तालुक्याचे अहवाल आणि सादरीकरण अशी कामे त्या शक्यतो इतरांवर सोपवितात. शाळा भेटी, नवीन उपक्रम याबाबत त्यांना फारसा उत्साह नसतो .

**वरील केसलेट मधील माहितीनुसार खालील प्रश्नाची उत्तरे द्या.**
**उत्तर लिहिताना प्रथम खालील सूचनांचा अवलंब करा.**
*** कमीतकमी शब्दात अधिक व योग्य आशय उत्तरातून प्राप्त व्हावा**
*** नेमके शब्द व वाक्य वापरून उत्तर लेखन अपेक्षित.**

१. अरुणा मॅडमच्या कामाचे मुद्देनिहाय वर्णन करा.
२. त्यांच्या या कामाचा तालुक्यातील शिक्षण प्रक्रिया, एकूण शैक्षणिक वातावरण यावर कोणता परिणाम होत असावा असे आपल्याला वाटते ?
३. पंचायत समितीच्या कामकाजात अरुणा मॅडमच्या वागण्यामुळे कोणते अडथळे स्टाफ, तालुक्यातील शिक्षक, विद्यार्थी, नागरिक यांना येत असावेत ?
४. पंचायत समिती अधिक कार्यकुशल होण्यासाठी नेमके कोणते बदल अरुणा मॅडम यांनी स्वतः मध्ये करावेत याबाबत आपण किमान तीन शिफारसी (थोडक्यात, सुटसुटीत शब्दात) कराल.
५. कोणत्याही पंचायत समितीचे काम उत्तम प्रकारे होण्यासाठी कोणत्या किमान तीन बाबी आपल्याला आवश्यक वाटतात ?

---

CASELET EXAMPLE 21

बाबा आमटे, त्यागी समाज सेवक ज्यांनी विदर्भातील चंद्रपूर जिल्ह्यात आनंदवन नावाची कुष्ठरोग्यांची वसाहत वसवून समाजसेवेचा एक आदर्श घालून दिला. बालपणीच्या काही आठवणी त्यांनी सांगितल्या, मी जेव्हा छोटा होतो ना तेव्हा मी खरच एक दिवस पैशाचं झाड लावलं आणि वाट पाहत बसलो केव्हा एकदा पैशाचे झाड उगवते आणि मला खूप पैसे मिळतील. बरेच दिवस निघून गेले पण पैशाचे झाड उगवलेच नाही, आईला ही गोष्ट कळली मग तिने मला पैशाची झाडे कशी लावली जातात हे समजून सांगितले, आंब्याची झाडं लावावीत, गव्हाचे पीक काढावं आणि मग अशा पिकातून धन प्राप्त होते असे ती म्हणाली. बाळ माती आणि मेहनत या दोन्हींवर श्रद्धा ठेवली तर पैसा आपोआप तुझ्या खिशात असेल. माझी आई काही विशेष शिकलेली नव्हती पण माझ्यासाठी मात्र ती एक उत्तम शिक्षक होती. एकदा माझ्या आईने मला एक बाहुली दिली. ती बाहुली पाडली की लगेच ताबडतोब ती उठून उभी राहायची, शेवटी तिला पाडणारा थकून जायचा. मला आईने ही बाहुली दिली आणि ती म्हणाली, आपल्याला एकसारखी आपटी खावी लागते, मी कधीच पडणार नाही, पराभूत होणार नाही, आपटणार नाही अशी फुशारकी मारून चालणार नाही. पुन्हा खाली न पडण्यात मोठेपण आहे असे नव्हे तर पराभव झेलून पुन्हा ताठ उभे राहण्यातच खरी मजा आहे. पराभवाच्या तडाख्याने खचून न जाता उभारीने काम करणे हेच खरं जीवन आहे.

**वरील केसलेट मधील माहितीनुसार खालील प्रश्नाची उत्तरे द्या.**
**उत्तर लिहिताना प्रथम खालील सूचनांचा अवलंब करा.**
*** कमीतकमी शब्दात अधिक व योग्य आशय उत्तरातून प्राप्त व्हावा**
*** नेमके शब्द व वाक्य वापरून उत्तर लेखन अपेक्षित.**

१.बाबा आमटे यांनी पैशाचं झाड लहानपणी कोणत्या हेतूने लावले ?
२.माती आणि मेहनत या दोन्हींवर श्रद्धा ठेवली तर पैसा आपोआप तुझ्या खिशात असेल, असे म्हणण्यामागे त्यांच्या आईचा काय उद्देश असावा ?
३.बाहुलीच्या माध्यमातून कोणती शिकवण बाबा आमटे यांना मिळाली ?

---

CASELET EXAMPLE 22

वाहन कसे चालवायचे हे आपण शिकत असतो, नंतर वाहन चालवण्याचा सतत सराव आपण करतो वाहन चालकाने वाहतुकीचे नियम समजून घेतले आहेत याची चाचणी घेऊनच आरटीओकडून परवाना दिला जातो. परवाना मिळाल्यानंतर वाहन चालकाची जबाबदारी वाढते कारण एका विश्वासावर सुरक्षित वाहन चालवण्याच्या अटीवर तो परवाना दिला गेलेला असतो. मात्र बऱ्याचदा नागरिकांमध्ये परवाना मिळाला, आता माझे कोणी काही बिघडवू शकत नाही अशा भावनेचा वापर होताना दिसतो. अत्यंत वेगाने बेजबाबदारपणे, स्पीडब्रेकर समोर असतानाही वाहनाचा वेग कमी न करणे, जोरजोरात हॉर्न वाजवणे, या बाबी पाहायला मिळतात. हे सर्व करताना स्वतःच्या सुरक्षिततेच्या संरक्षणासाठी लागणारे हेल्मेट उपयुक्त आहे हे समजून घेण्याचा प्रयत्न केला जात नाही. परंतु हेल्मेट घालून स्वतःच्या संरक्षणाची व मागे बसलेल्या व्यक्तीची जबाबदारी आपली आहे याचे भान ठेवले जात नाही यातूनच अपघात होतात. अपघात टाळण्यासाठी हेल्मेट नक्कीच मदत करू शकते कारण एखाद्या व्यक्तीचा अपघात झाला की त्याच्या जीवाला धोका होऊ शकतो. यासाठीच स्वतःच्या सुंदर जीवनाचा आनंद उपभोगण्यासाठी वाहतुकीच्या नियमांचे पालन सुरक्षितपणे करायला हवेत. यातून स्वतः सोबत इतरांचेही भले होते. स्वतःच्या सुरक्षिततेबरोबरच इतरांचीही सुरक्षितता किती महत्त्वाची आहे हे सामाजिक भान नागरिकांमध्ये तेव्हा निर्माण होईल ज्यावेळी वाहतुकीच्या नियमांची अंमलबजावणी केली जाईल आणि यातूनच अपघातांचे प्रमाण कमी करता येईल.

**वरील केसलेट मधील माहितीनुसार खालील प्रश्नाची उत्तरे द्या.**
**उत्तर लिहिताना प्रथम खालील सूचनांचा अवलंब करा.**
*** कमीतकमी शब्दात अधिक व योग्य आशय उत्तरातून प्राप्त व्हावा**
*** नेमके शब्द व वाक्य वापरून उत्तर लेखन अपेक्षित.**

१.महाराष्ट्रात अनेक ठिकाणी रस्त्यावर वाहन चालवताना वाहतुकीचे नियम पाळले जात नाहीत, याची महत्वाची कोणती कारणे असावीत ?

२.प्रत्येक नागरिकाने हे नियम पाळावे यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना कराव्यात असे आपल्याला वाटते ?

३.वाहतूक नियम पाळले नाही तर अपघात होण्याची शक्यता जास्त असते, यावर आपले म्हणणे थोडक्यात मांडा.

---

## CASELET EXAMPLE 23

शास्त्री मॅडम पुण्याहून मुंबईला जात होत्या. रेल्वेत त्यांच्या बाजूला एक कुटुंब बसले होते, कुटुंबात आजी, त्यांची नात मीनल, पती-पत्नी असे चौघेजण होते. मीनलच्या बाबांचे शास्त्री मॅडमला खूप कौतुक वाटले, कारण बराच वेळ ते मीनलसोबत मराठी गाणी, कविता यांची अंताक्षरी खेळले. आश्चर्य म्हणजे 'ध' ने सुरू होणारं गाणं म्हणायचं होतं तेव्हा चक्क तिने धरिला पंढरीचा चोर हा अभंग म्हटला. शास्त्री मॅडम म्हणाल्या, मीनल तुला हा अभंग पाठ कसा ? मी आजीसोबत मंदिरात भजनाला जाते म्हणून मला येतो असं ती म्हणाली. अंताक्षरी नंतर तिच्या बाबांनी रेल्वे संबंधात तिला खूप प्रश्न विचारले आणि शेवटी तिची आई आणि ती, दोघींनी मूक अभिनयातून गाणे ओळखण्याचा खेळ खेळला. प्रसंग छोटा होता, पण मॅडमला विचार करायला भाग पाडणारा होता. खरंच सर्वच पालक मीनलच्या पालकांसारखे मुलांशी संवाद साधू लागले तर किती छान होईल. मुलांचे अनुभवविश्व विस्तारित होईल, नवीन ज्ञानाची निर्मिती करण्याची आणि शिकण्याची प्रक्रिया खूप सोपी होईल.

**वरील केसलेट मधील माहितीनुसार खालील प्रश्नाची उत्तरे द्या.**
**उत्तर लिहिताना प्रथम खालील सूचनांचा अवलंब करा.**
*** कमीतकमी शब्दात अधिक व योग्य आशय उत्तरातून प्राप्त व्हावा**
*** नेमके शब्द व वाक्य वापरून उत्तर लेखन अपेक्षित.**

१. पालक आणि मुले यांच्यातला संवाद हरवत चालला आहे असे अनेक ठिकाणी दिसते यावर आपले मत द्या ?
२. मुलांची जडणघडण होताना कुटुंबाची जबाबदारी जास्त की शाळेची ? थोडक्यात लिहा.
३. शाळांमध्ये आयोजित पालकसभांमध्ये विद्यार्थी - पालक संवादाबाबत विषय अंतर्भूत असावेत का ?
याबाबत तुमचा अभिप्राय द्या.

---

## CASELET EXAMPLE 24

एकविसाव्या शतकाला माहिती-तंत्रज्ञानाचे शतक म्हणतात. या शतकातल्या विद्यार्थ्यांची पिढी मुळातच तंत्रज्ञानासोबत वाढलेली आहे त्यांच्या गरजांची पूर्तता करणे हे आजच्या शिक्षण व्यवस्थेसमोरील एक आव्हान आहे. तंत्रज्ञानाच्या कक्षा मोठ्या प्रमाणात रुंदावत गेल्या, अशा कालखंडात मुलांच्या शैक्षणिक जडणघडणीसाठी फक्त पारंपरिक खडू-फळा पद्धत अपूर्ण आहे. केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्याकरता पाठ्यक्रम शिकवणे ही संकल्पना आता कालबाह्य झालेली आहे. पाठ्यपुस्तक शिकवण्यापेक्षा पुस्तकच जगायला शिकवणे आवश्यक आहे. शिक्षकांच्या खिशाला पेनसोबत पेन ड्राईव्ह असणही महत्त्वाच आहे. म्हणूनच एकविसाव्या शतकातील शिक्षकांनी तंत्रस्नेही बनणे ही एकविसाव्या शतकाच्या शिक्षण प्रक्रियेची गरज बनली आहे. ज्ञानलालसेला सामोरे जातांना अधिकचे संदर्भ तात्काळ मिळवून देण्यासाठी आज अध्ययन अध्यापनासाठी केवळ पाठ्यपुस्तक पुरेसे नाही याची जाणीव शिक्षकांना होणे गरजेचे आहे. आजची पाठ्यपुस्तके, त्यात दिलेल्या कृती, क्यूआर कोडची योजना हे जाणून घेणे खूप गरजेचे आहे आणि त्यासाठीच माहिती तंत्रज्ञानाची मदत फार मोठ्या प्रमाणात होऊ शकते. विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेला, सृजनशीलतेला, चौकसपणाला, संशोधक वृत्तीला चालना देण्यासाठी शिक्षकांनी तंत्रस्नेही असणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**वरील केसलेट मधील माहितीनुसार खालील प्रश्नाची उत्तरे द्या.**
**उत्तर लिहिताना प्रथम खालील सूचनांचा अवलंब करा.**
*** कमीतकमी शब्दात अधिक व योग्य आशय उत्तरातून प्राप्त व्हावा**
*** नेमके शब्द व वाक्य वापरून उत्तर लेखन अपेक्षित.**

१. एकविसाव्या शतकात प्रत्येक शिक्षक तंत्रस्नेही असणे आवश्यक आहे, यावर आपण काय सांगाल ?
२. पाठ्यपुस्तक शिकवण्यापेक्षा पुस्तकच जगायला शिकवले पाहिजे याचा अर्थ आपल्या मते नमूद करा.
३. शिक्षकांच्या खिशाला पेन सोबत पेन ड्राईव्ह कशासाठी असावा असे आपल्याला वाटते ?

---

## CASELET EXAMPLE 25

सशक्त, सुदृढ, निर्व्यंग मूल जन्माला यावे, त्याच्या वाढीचे नैसर्गिक टप्पे अनुभवता यावेत हे प्रत्येक दाम्पत्याचे स्वप्न असते. पण काही दोष, उणीवा, अपंगत्व घेऊन बाळाचा जन्म झाला की सगळं घरदार निराशेच्या खाईत लोटले जाते. “रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग” सारखे या विशेष मुलांच्या पालकांचे सबंध आयुष्यच पणाला लागते.

दिव्यांग म्हणून या विशेष बालकांमध्ये काही वेगळी शक्ती, गुण दिसून येतात म्हणजे अपंगत्व असूनही असामान्य असूनही सर्वसामान्यपणे जीवन जगण्याची एक वेगळी शक्ती या बालकांमध्ये असते. शासनामार्फत अनेक योजना या विशेष बालकांसाठी आहेत मात्र प्रत्येक अव्यंग, सुदृढ व्यक्तीने दिव्यांगांसाठी मी काय करू शकतो हा विचार करणे आवश्यक आहे, त्यासाठी शिक्षणातून तसा संदेश मुलांपर्यंत जाणेही गरजेचे आहे. दिव्यांगाना समाजाबरोबर, सर्वसामान्य मुलांबरोबर कसे आणता येईल याचा सर्वंकष विचार होऊन शिक्षण सोयी उपलब्ध झाल्याच पाहिजेत. एकूणच दिव्यांगांचे शिक्षण आनंददायी हवे, त्यांच्या शारीरिक, मानसिक मर्यादा ओळखून ते दिले जावे.

**वरील केसलेट मधील माहितीनुसार खालील प्रश्नाची उत्तरे द्या.**
**उत्तर लिहिताना प्रथम खालील सूचनांचा अवलंब करा.**
*** कमीतकमी शब्दात अधिक व योग्य आशय उत्तरातून प्राप्त व्हावा**
*** नेमके शब्द व वाक्य वापरून उत्तर लेखन अपेक्षित.**

१.दिव्यांगांच्या शिक्षणासाठी सोयी सुविधा असूनसुद्धा अजूनही अनेक दिव्यांग बालके शिक्षणापासून वंचित आहेत, याची कोणती कारणे असावीत ?

२.दिव्यांग मुलांच्या समायोजनात मुख्याध्यापक व शिक्षक यांची भूमिका महत्वाची आहे यावर आपले मत थोडक्यात लिहा.

३.विशेष बालकांना नियमित शाळेत प्रवेश दिले जातात, याचा त्या बालकावर कसा परिणाम होत असावा?

---